नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०७/२०२४ (सोमवार)

---

## नागपूर ग्रामीण सर्व पोस्टे अंतर्गत नविन कायदेविषयक कार्यशाळा संपन्न

भारत सरकारने देशातील जुने कायदे बदलले आहे. त्यासोबत नवे कायदे संमत केले आहे. १) भारतीय न्याय संहीता २०२३ २) भारतीय साक्ष अधिनियम २०२३ ३) भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ सदर कायदयाचे ०१ जुलै २०२४ रोजी अंमलबजावणी होणार असुन त्या अनुषंगाने **मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण** यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दिनांक ०१/०७/२०२४ रोजी नवीन कायदे अंमलबजावणी बाबत कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक येथे जनजागृती कार्यशाळा (कार्यक्रम) आयोजित करण्यात आले. सदर कार्यक्रमास डॉ. श्री कृष्ण कुमार पांडे कुलसचिव, डॉ. श्री मधुसूदन पेना संचालक वारंगा परिसर, डॉ. श्री हरिकृष्ण वस्ती संचालक रामटेक परिसर, श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक, श्री प्रशांत काळे पोलीस निरीक्षक रामटेक तसेच कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठातील प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, पोलीस पाटील, पत्रकार, सरपंच व पोलीस स्टेशन मधील अधिकारी, अंमलदार हजर होते. तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन काटोल येथे नवीन तिन कायदे बाबत मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे नागपूर ग्रामीण येथील उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्री. राजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापू रोहम, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री अनिल म्हस्के (भापोसे), उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पुजा गायकवाड तसेच सर्व पोलीस स्टेशन येथील ठाणेदार यांनी आप आपल्या पोस्टे अंतर्गत नविन फौजदारी कायदयाबाबत कार्यशाळा घेण्यात आली. नवीन कायद्याबाबत माहिती सर्व ग्रामीण व शहरी भागातील नागरीकांना, पत्रकार, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महीला, युवक तसेच चालक–मालक, विविध स्वयंसेवक संघटनांचे महिला व पुरूष पदाधिकारी तसेच विदयार्थी व विदयार्थीनी, पोलीस पाटील मोठया प्रमाणात हजर राहुन सदर कार्यशाळेला मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळाला.




कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,


भारतीय न्याय संहिता 2023

# अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन भिवापूरची कार्यवाही

दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, भिवापूर येथे पाहमी फाटा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ याने नमुद घटनास्थळी जावुन टिप्पर क्र. एम एच– ४०/सी टी २४२४ च्या चालकाला थांबवून तपासले असता सदर वाहनात टिप्पर चालक व **आरोपी नामे–** १) आशिष संजय चवरे, वय २५ वर्ष, रा. सावरगाव ता. भिवापुर, जि. नागपुर हा टिप्परमध्ये अवैधरीत्या रेतीची चोरी करतांना मिळुन आल्याने त्याच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम एच– ४०/सी टी २४२४ किंमती अंदाजे २०,००,०००/– रू. व ०६ ब्रास रेती किंमती अंदाजे ४०,०००/– रू. असा एकुण २०,४०,०००/– रूपयाचा मुद्देमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सफौ अशोकसिंह ठाकुर, पो.स्टे भिवापूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे चालक **१) आशिश संजय चवरे, वय २५ वर्ष, रा. सावरगाव ता. भिवापुर, जि. नागपुर व मालक नामे–२) आकाश काकडे, वय ३२ वर्ष रा. बेसा ता. जि. नागपुर** यांचेविरुध्द कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम–१९६६, सहकलम २१, ४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा किशोर ठाकुर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि. जयप्रकाश निर्मल, सफौ अशोकसिंग ठाकुर, पोहवा राकेश त्रिपाठी, किशोर ठाकुर यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर